# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

पुढारी | पुणे, सोमवार
९ जुलै २०१८

# विद्यार्थ्यांनी घेतला भात लावणीचा अनुभव

## आंबोली येथे प्रत्यक्ष सहभाग



आंबोली (ता. खेड) येथे भात लावणी करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व प्राध्यापक.

चास : वार्ताहर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतवर्षी उपक्रमांतर्गत 'एक दिवस शेतासाठी, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी' या योजनेनुसार येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना समितीतील प्राध्यापक, विद्यार्थी स्वयंसेवकांनी खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात आंबोली येथे भात लावणीचा अनुभव घेतला. या वेळी इंद्रायणी, रायभोग, भोगावती जातीच्या वाणांची लागवड करण्यात आली.

या अभियानामुळे शेतकऱ्यांचे जीवन जवळून पाहता पाहता मातीशी नाते अनुभवता आले. जे आपल्याशी व काम करण्याची प्रेरणा, ऊर्जा देणारे ठरेल, अशी भावना उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व प्रा. दिलीप मुळूक यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ. एन. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, समिती सदस्य प्रा. गणेश धुमाळ, प्रा. संदीप बोरात, प्रा. निलेश चाले आणि स्वयंसेवक नितीन सावंत, दत्ता शिंदे, गणेश शिंदे यांनी केले. आंबोलीचे सरपंच लक्ष्मण शिंदे, राजेंद्र शिंदे, सुभाष शिंदे यांनी आभार मानले. प्रत्यक्ष श्रमदानात सहभाग घेतला.

सकाळ
बुधवार, ११ जुलै २०१८ | ४

# विद्यार्थ्यांनी घेतला भात लागवडीचा अनुभव

**चाकण, ता. १० :** राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकांनी पश्चिम डोंगराळ भागातील आंबोली (ता. खेड) येथील शेतात भात लागवडीचा अनुभव घेतला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतवर्षा उपक्रमांतर्गत 'एक दिवस शेतासाठी, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी' या घोषवाक्यानुसार हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना समितीतील प्राध्यापक, विद्यार्थी, स्वयंसेवक आदींनी भात लागवड केली. श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व पटवून देणे तसेच अन्नधान्य निर्मितीत शेतकऱ्यांचे किती कष्ट असतात, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी भात लागवड अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी



आंबोली (ता. खेड) : भात लागवड करताना हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे विद्यार्थी.

इंद्रायणी, रायभोक, भोगावती जातीच्या वाणाची लागवड करण्यात आली. शेतकऱ्यांच्या कष्टाचा व शेतातील जीवनाचा अनुभव विद्यार्थ्यांना जवळून पाहता आला, असे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक यांनी सांगितले. भात लागवड अभियानाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात आदींनी केले. या वेळी आंबोलीचे सरपंच लक्ष्मण शिंदे, राजेंद्र शिंदे, सुभाष शिंदे यांनी विद्यार्थी, प्राध्यापकांचे स्वागत करून आभार मानले.

लोकमत
पुणे, रविवार,
दि. १५ जुलै २०१८
३

# विद्यार्थ्यांनी लुटला भातलागवडीचा आनंद

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतवर्षा उपक्रमांतर्गत 'एक दिवस शेतासाठी, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी' या घोषवाक्यानुसार येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना समितीतील प्राध्यापक व विद्यार्थी स्वयंसेवकांनी खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील आंबोली येथे भातलागवडीचा आनंद अनुभवला.

श्रम प्रतिष्ठेचे महत्त्व पटवून देणे तसेच अन्नधान्य निर्मितीत शेतकऱ्यांचे किती कष्ट असतात याची जाणीव विद्यार्थ्यांना करुन देण्यासाठी या भातलागवड अभियानाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी-प्राध्यापकांचे गट करून वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या शेतात पाठविण्यात आले. या वेळी इंद्रायणी, रायभोग, भोगावती जातीच्या वाणाची लागवड करण्यात आली.



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थी आंबोली येथे भातलागवडीचा आनंद अनुभवताना.

या अभियानामुळे शेतकऱ्यांचे जीवन जवळून पाहताना श्रमातून आनंद घेत त्याचबरोबर आपल्या मातीशी नाते टिकवून काम करण्याची प्रेरणा मिळाले, अशी भावना उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व प्रा. दिलीप मुळूक यांनी व्यक्त केली.

या भातलागवड अभियानाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, समिती सदस्य प्रा. गणेश धुमाळ, प्रा. संदीप बोऱ्हाडे, प्रा. नीलेश बारणे आणि स्वयंसेवक नितीन सावंत, दत्ता शिंदे, गणेश शिंदे यांनी केले. आंबोलीचे सरपंच लक्ष्मण शिंदे तसेच राजेंद्र शिंदे, सुभाष शिंदे यांनी सर्व विद्यार्थी- प्राध्यापकांचे स्वागत करुन आभार मानले व प्रत्यक्ष श्रमदानात सहभाग घेतला.

केसरी पुणे, ११ जुलै २०१८

# विद्यार्थी - प्राध्यापकांनी घेतला भात लागवडीचा अनुभव

राजगुरुनगर, (वार्ताहर) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतवर्षा उपक्रमांतर्गत एक दिवस शेतासाठी, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी या घोषवाक्यानुसार येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना समितीतील प्राध्यापक व विद्यार्थी स्वयंसेवकांनी खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील आंबोली येथे भात लागवडीचा आनंद अनुभवला.

श्रम प्रतिष्ठेचे महत्त्व पटवून देणे तसेच अन्नधान्य निर्मितीत शेतकऱ्यांचे किती कष्ट असतात याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी या भात लागवड अभियानाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी-प्राध्यापकांचे गट करून वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या शेतात पाठविण्यात आले. यावेळी इंद्रायणी, रायभोक, भोगावती जातीच्या वाणाची लागवड करण्यात आली. या अभियानामुळे शेतकऱ्यांचे जीवन जवळून पाहता पाहता श्रमातून आनंद घेता आला आणि मातीशी नाते अनुभवता आले. जे जगण्याची व काम करण्याची प्रेरणा, उर्जा देणारे होते अशी भावना उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व प्रा.दिलीप मुळूक यांनी व्यक्त केली. या भात लागवड अभियानाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा.गणेश घुमाळ, प्रा.संदीप थोरात यांनी केले.

**पुढारी** | पुणे, बुधवार ११ जुलै २०१८



आंबोली येथे भात लावणी करताना राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक.

# विद्यार्थ्यांनी घेतला भात लावणीचा अनुभव

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा आंबोली येथे उपक्रम

वाफगाव : वार्ताहर

श्रम प्रतिष्ठेचे महत्त्व कळावे आणि अन्नधान्य निर्मितीत शेतकऱ्यांना किती कष्ट असतात याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने आंबोली (ता. खेड) येथे भात लागवडीची मोहीम राबविण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतवर्षा उपक्रमांतर्गत 'एक दिवस शेतासाठी, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी' या घोषवाक्यानुसार राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी भात लागवडीचा अनुभव घेतला.

यात विद्यार्थी-प्राध्यापकांचे गट करून वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या शेतात पाठविण्यात आले होते. या वेळी इंद्रायणी, रायभोग, मोगावती जातीच्या वाणांची लागवड करण्यात आली. याचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात, प्रा. निलेश बारणे आणि स्वयंसेवक नितीन सावंत, दत्ता शिंदे, गणेश शिंदे यांनी केले. आंबोलीचे सरपंच लक्ष्मण शिंदे, राजेंद्र शिंदे, सुभाष शिंदे यांनी सर्व विद्यार्थी-प्राध्यापकांचे स्वागत करून आभार मानले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व प्रा. दिलीप मुळूक म्हणाले की, या अभियानामुळे शेतकऱ्यांचे जीवन जवळून पाहता आले. श्रमातून मातीशी नाते अनुभवता आले. जे जगण्याची व काम करण्याची प्रेरणा, ऊर्जा देणारे होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख